Ms
JD(APC)
25/7/17

जनहित याचिका क्रमांक १७३/२०१०
डॉ.महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर
(ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी संनित्रण समिती स्थापन करण्याबाबत)

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

170724 ID 0024

शासन शुध्दीपत्रक क्र. डिआयएस ०९१०/प्र.क्र.४३४ (भाग-२)/विशा १ ब
शहीद भगतसिंग चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०७ जुलै, २०१७.

वाचा :-

शासन परिपत्रक, गृह विभाग क्र.डिआयएस ०९१०/प्र.क्र.४३४(भाग-२)/विशा १ ब, दिनांक २८.०२.२०१७ व दिनांक ०३.०४.२०१७.

शुध्दीपत्रक :-

जनहित याचिका क्र.१७३/२०१० या संदर्भात मा उच्च न्यायालयाने दिनांक १३.०३.२०१५, २४.०६.२०१५ व दिनांक १०,११,१२ व १६.०८.२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार ध्वनी प्रदूषणासंदर्भात प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक यांना संदर्भाधीन दिनांक २८.०२.२०१७ च्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार ध्वनी प्रदूषण संनियंत्रण समिती गठीत करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते. त्यानुसार मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई व नागपूर आयुक्तालयाकरिता सह पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सह नियंत्रण समितीची संरचना करण्यात आली आहे.

या संदर्भात सह पोलीस आयुक्त (का. व सु.), मुंबई यांनी महाराष्ट्र राज्यातील इतर कोणत्याही जिल्हा व आयुक्तालयापेक्षा मुंबई शहराची कार्यकक्षा तुलनेने खुपच मोठी असल्याने तसेच मुंबई आयुक्तालय आस्थापनेवरील एकूण ९३ पोलीस ठाणे व १३ परिमंडळे ही संरचना व त्यानुसार कामाची प्रचंड व्यापती विचारात घेता ध्वनी प्रदुषण विरोधातील कारवाई अधिक प्रभावीपणे होण्याकरीता व त्यावर परिणामकारक पर्यवेक्षण राहण्यासाठी प्रस्तुत एक ध्वनी प्रदुषण संनियंत्रण समिती पुरेशी नाही. त्यामुळे मुंबई पोलीस आयुक्तलयासाठी एका समितीऐवजी प्रादेशिक विभागीय अपर पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या अध्यक्षतेखांली ०५ ध्वनी प्रदुषण समित्या गठीत करण्याची शिफारस सह पोलीस आयुक्त (का. व सु.), मुंबई यांनी केली आहे.

त्यानुसार मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये सह पोलीस आयुक्त (का. व सु.), मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील समित्यांऐवजी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत प्रत्येक प्रादेशिक विभागनिहाय एक अशा एकूण पाच ध्वनीप्रदूषण संनियंत्रण समित्या स्थापन करण्यात याव्यात असा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार मुंबई पोलीस आयुक्तालयाकरिता प्रत्येक प्रादेशिक विभागनिहाय ध्वनीप्रदूषण संनियत्रण समितीची (Monitoring Committee) संरचना खालीलप्रमाणे राहील असे वाचावे. :-

| | | |
|---|---|---|
| १. प्रादेशिक विभागीय अपर पोलीस आयुक्त, मुंबई | - | अध्यक्ष |
| २. परिमंडळीय पोलीस उप आयुक्त | - | सदस्य |
| ३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ | - | सदस्य |

Kollue & 27/7/17
pl. give copy to SRO/RO



pl. circulate through e-mail to all RO/SRO.

शासन शुध्दीपत्रक क्रमांकः डिआयएस ०९१०/प्र.क्र.४३४ (भाग-२)/विशा १ ब

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७०७०७१५४३३१६५२९ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vijay D Patil

Digitally signed by Vijay D Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5254aa09c72b0eb445f264826ab10bb4279 3fc26e3838113296e7ff812051f6f, cn=Vijay D Patil
Date: 2017.07.07 15:43:36 +05'30'

(विजय पाटील)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मा.मंत्री /मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. महाराष्ट्रातील सर्व मा.संसद सदस्य
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा
७. सर्व मा. विधानपरिषद / विधानसभा सदस्य
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग
१०. अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१४. पोलीस आयुक्त (सर्व)
१५. परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक (सर्व)
१६. सर्व प्रादेशिक विभागीय अपर पोलीस आयुक्त, मुंबई
१७. सर्व पोलीस उप आयुक्त, मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई, नागपूर, अमरावती, सोलापूर, नाशिक, औरंगाबाद, लोहमार्ग मुंबई.
१८. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी (सर्व)
१९. जिल्हा पोलीस अधिक्षक (सर्व)
२०. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२१. गृह विभाग/ विशा १ ब
२२. निवड नस्ती.

----------